दैनिक
# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.३० मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## कर्नाटकात शेतजमिनीच्या वादातून सहा जणांचा खून

विजयपुरा दि.२९ (वृत्तसंस्था)- कर्नाटकातील विजयपुरा जिल्ह्यातील चाडाचन तालुक्याच्या गोविंदपुरा गावात भीमा नदीच्या परिसरात भयानक घटना घडली. शेतजमिनीच्या जुन्या वादातून तब्बल सहा जणांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील पाच सदस्यांचा समावेश असून, या सामूहिक हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ माजली. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गोविंदपूर गावातील निराळे कुटुंब आणि गोलगी कुटुंब यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून शेतजमिनीवरून वाद सुरू होता. या प्रदीर्घ काळापासून चालत आलेल्या वादाने शुक्रवारी अत्यंत हिंसक वळण घेतले. गोलगी कुटुंबातील सदस्यांनी पूर्वनियोजित कट रचून निराळे कुटुंबावर गोळाबार आणि धारदार शस्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यात निराळे कुटुंबातील पाच जणांसह एकूण सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, चंदू निराळे, दुंदप्पा निराळे, शिवपुत्र निराळे, राहुल निराळे, समर्थ निराळे आणि शब्बीर नादाफ अशी मृतांची नावे आहेत. या घटनेची माहिती मिळताच चाडचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस फौजफाटा तातडीने घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयात पाठवले आहेत.

## एल निनोचा परिणाम; यंदा देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस

### हवामान विभागाच्या ताज्या अंदाजामुळे खरिपाची शेती संकटात!

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) शुक्रवारी यंदाच्या मोसमासाठीचा सुधारित दीर्घकालीन अंदाज जाहीर केला. या अंदाजानुसार यंदा जून महिन्यात एल निनो सक्रीय होणार असल्यामुळे यंदाच्या मोसमात सरासरीच्या ९० टक्केच पाऊस होण्याची शक्यता आहे. नेहमीपेक्षा कमी पावसाच्या शक्यतेमुळे शेतीवर मोठा परिणाम होणार असून त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच सर्वांचीच चिंता वाढली आहे.

आयएमडीच्या या अंदाजानुसार यंदा जून महिन्यांतच एल निनो सक्रीय होईल आणि हळूहळू एल निनोचा प्रभाव वाढत जाईल. परिणामी जून महिन्यात नेहमीपेक्षा अधिक प्रमाणात उष्णतेच्या लाटा तीव्र राहण्याची शक्यता आहे. एल निनोच्या सावटामुळे जून ते सप्टेंबरदरम्यान नैऋत्य मोसमी पाऊस सरासरीच्या ९० टक्के होण्याची शक्यता आहे. या अंदाजामध्ये चार टक्के कमी-अधिक परिणाम दिसून येऊ शकतो. याचा अर्थ २०२६ च्या मान्सून हंगामात (जून ते सप्टेंबर) संपूर्ण देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल.

यापूर्वी हवामान विभागाने एप्रिल महिन्यात वर्तवलेल्या अंदाजात सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवला होता. सुधारित दीर्घकालीन अंदाज हे प्रमाण आणखी खाली घसरल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. सध्या प्रशांत महासागरात एल निनोची परिस्थिती निर्माण होत आहे. ही प्रणाली भारतात नैऋत्य मोसमी पावसाच्या काळात पोहोचण्याचा अंदाज आहे. त्याचा भारतातील खरिप पिकांवर मोठा परिणाम होणार आहे.

यंदाच्या मोसमात ईशान्य भारतात नैऋत्य मोसमी पाऊस सामान्य म्हणजेच दीर्घकालीन सरासरीच्या ९४ ते १०६ टक्के राहण्याची सर्वाधिक शक्यता आहे. तर मध्य व दक्षिण द्विपकल्पीय भारतात सरासरीच्या ९४ टक्के तर वायव्य भारतात सरासरीपेक्षा कमी म्हणजेच ९२ टक्के पाऊस होण्याची शक्यता आहे.

मान्सून गाभा क्षेत्रातही पाऊस सरासरीपेक्षा कमीच राहण्याची शक्यता असून जून महिन्यात संपूर्ण देशभरातील पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची दाट शक्यता आहे. जूनमध्ये देशाच्या बहुतेक भागात सरासरीपेक्षा कमी मासिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. (पान ४ वर)

### महाराष्ट्रासाठी चिंताजनक चित्र

महाराष्ट्रासाठी यंदाच्या मान्सून हंगामात अत्यंत चिंताजनक चित्र समोर आले आहे. राज्यात यंदा पाऊस सामान्यपेक्षा कमी पडण्याची आणि उष्णतेच्या लाटा तीव्र राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भाग हे मान्सून कोअर झोनमध्ये येतात. हाच झोन देशातील आणि राज्यातील बहुतांश कोरडवाहू शेतीचा मुख्य कणा आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, या कोअर झोनमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची ४३ टक्के शक्यता आहे. त्यामुळे चालू वर्षातील खरीप हंगामावर याचा विपरित परिणाम होण्याची भीती शेतकरी वर्गात व्यक्त केली जात आहे.

### मान्सून ७ दिवसांनी केरळात पोहोचेल

देशात मान्सूनचे आगमन उशिरा झाले आहे. हवामान विभागाने शुक्रवारी सांगितले की, श्रीलंकेतील कमी दाबाच्या वादळी वाऱ्यांमुळे मान्सून ७ दिवसांनंतरच केरळच्या किनारपट्टीवर पोहोचू शकेल. केरळच्या किनारपट्टीवर मान्सून पोहोचण्याची सामान्य तारीख १ जून मानली जाते. यापूर्वी हवामान विभागाने २६ मे पर्यंतच मान्सून येण्याचा अंदाज वर्तवला होता. अशा प्रकारे, मागील अंदाजानुसार मान्सून सुमारे १० दिवसांनंतर देशात दाखल होईल.आयएमडीनुसार, जून-जुलैमध्येही उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात आणि आंध्र प्रदेशमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. सामान्यतः त्यावेळी तापमान ३०-३५ अंश सेल्सिअसपर्यंत असते. यावेळी तापमान ३ अंश सेल्सिअसने जास्त राहील.

## विषारी दारुचे १३ बळी; दोघांची प्रकृती गंभीर, आठ आरोपींना बेड्या

### सख्ख्या भावांनी गमावला जीव, वडिलांचे डोळे निकामी; पिंपरी चिंचवडच्या दापोडी, फुगेवाडीतील घटना



दापोडी दि.२९ (प्रतिनिधी)- पुण्यासह पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे सुरू झालेले मृत्यूचे तांडव थांबत नसून सारे शहरच हादरून गेले आहे. एकामागून एक सुरू असलेल्या मृत्यूसत्रामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. आनंदवन, काटेवस्ती, संजयनगर, आझाद चौक आणि जय महाराष्ट्र चौक या परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, परिसरात भीतीचे वातावरण आहे. तर विषारी दारूमुळे एकाच घरातील दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विषारी दारुमुळे पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडीतील विजय राठोड आणि विजु राठोड या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झालाय तर त्यांचे वडील प्रकाश यांची देखील दृष्टी नाहीशी झाली आहे. त्यांनाही उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. विजय आणि राजू राठोड हे दोघांचीही मुलं लहान आहेत. त्यांच कुटुंब या दारुकांडामुळे अक्षरशः उघड्यावर आलं आहे.

दोघांच्या पत्नी सारिका आणि संगीता या दोघींनी बोलताना सांगितलं की, "घरातील कर्ते पुरुष गेले, आता मुलांना कसं वाढवायचं?" असा आक्रोश पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडीतील राठोड कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. विषारी दारूमुळे विजय राठोड आणि विजू राठोड या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला, तर त्यांचे वडील प्रकाश राठोड यांचीही दृष्टी गेली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विजय आणि विजू या दोघांचीही मुलं अजून लहान आहेत. या दुर्घटनेमुळे संपूर्ण कुटुंबावर मोठं संकट कोसळलं असून कुटुंब अक्षरशः उघड्यावर आलं. पती गमावल्याचं दुःख आणि पुढील आयुष्याची चिंता व्यक्त करताना पत्नी सारिका आणि संगीता राठोड यांना अश्रू अनावर झाले. "आता मुलांचं शिक्षण, घरखर्च कसा चालवायचा?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रशासनाने दोषींवर कठोर कारवाई करावी आणि कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. या संपूर्ण घटनेनंतर फुगेवाडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांमध्ये संतापाचं वातावरण आहे.

## शेअर बाजारात सेन्सेक्समध्ये ११०० अंकांची घसरण

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- भारतीय शेअर बाजारात सुरुवातीच्या तेजीनंतर घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये देखील घसरण झाली. अमेरिका आणि इराण यांच्यातील कराराबद्दलची अनिश्चितता यामुळं शेअर बाजारावर परिणाम पाहायला मिळाली. सेन्सेक्स सुरुवातीला १३०० अंकांनी घसरला होता. तर, निफ्टी ५० २३४८५ अंकांपर्यंत खाली होता. मात्र नंतर, स्थिती थोडीशी सुधारली.

शेअर बाजारातील घसरणीमुळं सेन्सेक्स आणि निफ्टी ५० लाल रंगात बंद झाला. सेन्सेक्स १०९२ अंकांनी घसरला आणि ७४७७५.७४ अंकांवर बंद झाला. तर, नॅशनल स्टॉक एक्सचेंजवर निफ्टी ५० निर्देशांक २४ हजारांच्या पार गेला होता. त्यामध्ये पुन्हा घसरण झाली. निफ्टी ५० निर्देशांक ३५९ अंकांच्या घसरणीसह २३५४७.७५ अंकांवर बंद झाला. याशिवाय बीएसई मिडकॅप १५० आणि बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांक घसरणीसह बंद झाला.

शेअर बाजारातील घसरणीमुळं बीएसईचं बाजारमूल्य देखील घसरलं. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४७१ लाख कोटींवरुन घसरुन ४६५ लाख कोटींवर आले. म्हणजेच शेअर बाजारात आज गुंतवणूकदारांचं ६ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे.

निफ्टी ५० निर्देशांकापैकी ४३ शेअर घसरणीसह बंद झाले. निफ्टीवर पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन, इंटरग्लोब एव्हिएशन आणि ओएनजीसीच्या शेअरमध्ये सर्वाधिक घसरण झाली. तर, आयटी स्टॉक्सपैकी टेक महिंद्रा, एचसीएल टेक आणि विप्रोच्या शेअरमध्ये तेजी दिसून आली.

## बिहारमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा धुमाकूळ, ७ जणांचा वीज पडून मृत्यू



पाटणा दि.२९ (प्रतिनिधी)- बिहारमध्ये मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने धुमाकुळ घातला. पाटणा, खगडिया, रोहतास, औरंगाबाद, कैमूर आणि छपरा यासह २० जिल्ह्यांमध्ये सकाळी अंधार पसरला आणि त्यानंतर मुसळधार पाऊस सुरू झाला. राज्यात वीज पडून सात जणांचा मृत्यू झाला. काळ्या ढगांमुळे लोक आपल्या वाहनांचे दिवे लावून प्रवास करताना दिसले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बिहारमध्ये पुढील तीन दिवस हवामान असेच राहील. दरम्यान, मध्य प्रदेशात ग्वाल्हेर, मोरेना, श्योपूर, निवारी, टिकमगड आणि छतरपूर जिल्ह्यांमध्ये दिवसा उष्णतेची लाट येईल, तर संध्याकाळी गारपीट आणि पावसाची शक्यता आहे.

यूपीत लखनौ, प्रयागराज, झाशी आणि चंदौली येथे मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला. वाऱ्याचा वेग ताशी १०० किलोमीटरपर्यंत पोहोचला होता. हमीरपूरमध्ये वादळामुळे एक बांधकाम सुरू असलेला पूल कोसळला. यात सहा जणांचा मृत्यू झाला. लखनौमधील एका रेल्वे स्थानकावरील पत्र्याचे शेड कोसळून दोघे जण जखमी झाले. राजस्थानच्या १२ जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.

देशात नौतप ऋतू सुरू असताना १० राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पाऊस पडत आहे. युरोपियन हवामान संस्था, युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्ट्सने उपग्रह, महासागर आणि वातावरणीय माहितीच्या आधारे भारतासाठी १५ दिवसांचा पावसाचा अंदाज तयार केला आहे. या अंदाजानुसार, पुढील आठ दिवसांत केरळ, तामिळनाडू, दिल्ली, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या

### मनोज जरांगे आजपासून उपोषण करणार

जालना दि.२९ (प्रतिनिधी)- राज्य सरकार म्हणतंय कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्या, मग त्या जाहीर करा, त्या सर्वांना प्रमाणपत्र द्या अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. आधीच्या राज्यकर्त्यांनी मराठ्यांसाठी काही केलं नाही, म्हणून तुम्हाला सत्तेत आणलं, मराठ्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे म्हणाले. हैदराबाद गॅझेटप्रमाणे सातारा गॅझेटचा जीआर काढा, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार हे लेखी द्या अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे यांनी केली. मराठा समाजासाठी तुम्हाला जेवढं शक्य आहे तेवढं करा, मी आंदोलन करणारच असा इशाराही त्यांनी दिला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे ३० मे पासून अंतरावाली सराटीमध्ये आंदोलन करणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली आणि आरक्षणाच्या मागणीवर चर्चा केली. या शिष्टमंडळात (पान ४ वर)

## विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपाची मविआची घोषणा

### १५ जागांवर एकमत; नांदेड, नाशिकच्या जागांवर लवकरच निर्णय

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्यात विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने एकीकडे महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठका सुरू आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्येही बैठकांचा धडाका सुरू आहे. या पार्श्वभूमीवरच आज (२९ मे) महाविकास आघाडीची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत महाविकास आघाडीचा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज संयुक्त पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीतील कोणता पक्ष किती जागा लढवणार? याची घोषणा करण्यात आली आहे. महाविकास आघाडी संपूर्ण १७ जागा लढवणार असून यापैकी १५ जागांवर महाविकास आघाडीच्या नेत्यांचं एकमत झालं आहे. तसेच राहिलेल्या दोन जागांबाबतचा निर्णय दोन दिवसांत घेतला जाणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

"विधानपरिषदेच्या जागा वाटपाच्या पार्श्वभूमीवर आज आमची महाविकास आघाडीची महत्वाची बैठक पार पडली. १७ जागांपैकी १५ जागांबाबत आमचा निर्णय झाला आहे. कोणता पक्ष कोणती जागा लढवेल? यावर आमचं एकमत झालं आहे. मात्र, दोन ठिकाणच्या दोन जागांबाबत आमची अद्याप चर्चा सुरू आहे. येणाऱ्या दोन दिवसांत या राहिलेल्या दोन जागांबाबत देखील आमचा अंतिम निर्णय होईल. नांदेड आणि नाशिकच्या जागेबाबत आमच्या तिन्ही पक्षांनी दावा केला आहे. त्यामुळे या दोन्ही जागा वगळता इतर १५ जागांबाबत आम्ही आज निर्णय जाहीर केला आहे", असं हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं आहे.

## नीट परीक्षेसाठी वायू दलाचा वापर हा मूर्खपणा, हवाई दल राष्ट्रीय सुरक्षेसाठी, भाजपच्या नाकर्तेपणाची भरपाई करण्यासाठी नव्हे - आंबेडकर



मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या नीट परीक्षेसाठी हवाई दलाचा वापर करण्यास कडाडून विरोध केला आहे. भारतीय हवाई दल हे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अस्तित्वात आहे, ते भाजपचा नाकर्तेपणा व शिक्षण मंत्रालयातील खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराची भरपाई करण्यासाठी नव्हे, असे त्यांनी म्हटले आहे.

केंद्र सरकारने नीट पेपरफुटी रोखण्यासाठी आता थेट हवाई दलाची मदत घेण्याच्या मुद्द्यावर गांभिर्याने विचार सुरू केला आहे. यासंबंधीच्या प्रस्तावानुसार, हवाई दलाच्या विमनांचा व त्यांच्या कडक सुरक्षा प्रोटोकॉलचा वापर करून नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका थेट व सुरक्षितपणे वितरित केल्या जाणार आहेत. यामुळे कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला जागा उरणार नाही. या प्रस्तावावर अंतिम निर्णय पीएमओच्या मंजुरीनंतर घेतला जाईल. या सर्व प्रक्रियेवर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नजर आहे. या पार्श्वभूमीवर वंचितच्या प्रकाश आंबेडकर यांनी या निर्णयावर निशाणा साधला आहे.

## यूपीएससीमध्ये कधी पेपरफुटी झाली नाही, त्यांच्याकडून धडा घ्या

### सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला फटकारले

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत अटक केलेल्यांची संख्या ११ च्याही पुढे गेली आहे. सीबीआयकडून नीट पेपरफुटी प्रकरणात सखोल चौकशी केली जात आहे. यंदा जवळपास २२.७ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ही नीटची परीक्षा दिली होती. पण पेपरफुटीच्या घटनेमुळे केंद्र सरकारने ही परीक्षा रद्द केली. आता २१ जून रोजी ही नीटची पुनर्परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे या २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पुन्हा नीट परीक्षा द्यावी लागणार आहे.

दरम्यान, या नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज (२९ मे) सुनावणी पार पडली आहे. या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षा पेपरफुटीवरून एनटीएला फटकारलं आहे. 'यूपीएससीमध्ये कधी पेपरफुटी झाली नाही, त्यांच्याकडून धडा घ्या', असं सांगत सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला फटकारलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल टेस्टिंग एजन्सी ला विचारलं की, देखरेख यंत्रणा आणि पर्यवेक्षण समित्या अस्तित्वात असूनही एवढी मोठी पेपर फुटीची घटना कशी घडू शकते? असा सवाल न्यायालयाने विचारला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने यूपीएससीशी तुलना करत न्यायालयाने म्हटलं की, "देशाच्या या प्रमुख नागरी सेवा परीक्षेत अशा पेपर फुटीच्या घटना कधीही घडल्या नाहीत, त्यामुळे त्यांच्याकडून नॅशनल टेस्टिंग एजन्सीला धडा घेण्याची गरज आहे." केंद्र सरकारच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत.' सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेचा पेपर रद्द झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच आता ही परीक्षा योग्यरित्या पार पाडली जाईल याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी फेरपरीक्षेपूर्वी अनेक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या जातील.

## अजित पवार विमान अपघात प्रकरण: तपास होणार नसेल तर 'सीआयडी' कार्यालयाला टाळे लावा-रोहित पवार

पुणे दि.२९ (प्रतिनिधी)- राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्य प्रकरणाला चार महिने झाले आहेत. विमान अपघात प्रकरण संवेदनशील आहे. चार महिन्यानंतर राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीआयडी) अपघात प्रकरणात ठोस माहिती, तसेच तपासातील प्रगती अहवाल सादर करण्यात आला नाही. तपास होणार नसेल तर 'सीआयडी' कार्यालयाला टाळे लावा, अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी केली.

दिवंगत मुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामती परिसरात विमान अपघात झाला. अपघात प्रकरणाचा सखोल तपास करुन दोषींवर कठोर कारवाईची मागणी रोहित पवार यांनी केली होती. विमान अपघात प्रकरणाचा तपास 'सीआयडी'कडून करण्यात येत आहे. सीआयडीकडून तपास संथगतीने होत आहे. अद्याप ठोस कारवाई तसेच तपासातील प्रगती अहवाल सादर करण्यात आला नाही, अशी टीका रोहित पवार यांनी शुक्रवारी (२९ मे) केली. 'सीआयडी' कार्यालयाला पवार यांनी (पान ४ वर)

## पेट्रोल-डिझेल दरवाढ आणि महागाईविरोधात नागपुरात काँग्रेस रस्त्यावर; सरकारला इशारा



नागपूर दि.२९ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे देशात पेट्रोल, डिझेल आणि जीवनावश्यक वस्तूंच्या दरांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे जगणे असह्य झाले आहे. या विरोधात शुक्रवारी नागपूर शहर आणि ग्रामीण काँग्रेसतर्फे जिल्हाधिकारी कार्यालया पुढे निदर्शने करण्यात आली.

आंदोलनादरम्यान काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या. वाढलेली महागाई आणि इंधन टंचाई त्वरित दूर न झाल्यास आंदोलन आणखी तिव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन सादर करण्यात आले, ज्यामध्ये पेट्रोल-डिझेलची दरवाढ तात्काळ मागे घेण्याची आणि महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांनी एकत्र येत शक्तीप्रदर्शन केले. यामध्ये रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री व आमदार डॉ. नितीन राऊत, माजी मंत्री सुनील केदार, माजी मंत्री अनिस अहमद, आमदार संजय मेश्राम, माजी आमदार तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष (पान ४ वर)

## हायकोर्टांनी निकाल तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ राखून ठेवू नयेत-सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील सर्व उच्च न्यायालयांमधील निकालांच्या विलंबावर चिंता व्यक्त केली आहे. न्यायालयाने सांगितले की, 'कोणत्याही प्रकरणात निकाल राखून ठेवल्यानंतर, तो तीन महिन्यांच्या आत दिला गेला पाहिजे. जर तीन महिन्यांच्या आत निकाल दिला गेला नाही, तर उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल हे प्रकरण सरन्यायाधीशांसमोर ठेवतील.' सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने असेही म्हटले आहे की, जामीन अर्जांवरील आदेश त्याच दिवशी दिले पाहिजेत. जर निकाल राखून ठेवला असेल, तर तो दुसऱ्या दिवशी जारी केला पाहिजे आणि त्वरित वेबसाइटवर अपलोड केला पाहिजे.

न्यायालयाने या संदर्भात १२ निर्देश जारी केले. हे निर्देश झारखंड सरकारशी संबंधित एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान देण्यात आले, ज्यामध्ये असा आरोप करण्यात आला होता की उच्च न्यायालयाने २०२२ पासून कोणताही निकाल दिलेला नाही. चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या एका प्रकरणात न्यायालयाने हा आदेश (पान ४ वर)

## सोने खरेदी नंतर; देश प्रथम

भारतीयांना सोन्याचे आकर्षण पूर्वीपासूनच आहे. पण मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सोन्याच्या खरेदीमुळे देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. त्यामुळे आता 'आधी देश, नंतर सोने' हा विचार स्वीकारून जबाबदारीने गुंतवणूक करण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतीय समाज आणि सोने हे एक आगळेवेगळे नाते आहे. अन्न, वस्त्र, निवारा इतकीच आम्हा भारतीयांसाठी सोनेदेखील जीवानवश्यक गरज आहे, असे अतिशयोक्तीने म्हटले जाते. सोने स्वस्त असो व महाग असो, सोने खरेदीचा ओघ फार पूर्वीपासून आपल्या देशामध्ये चालत आलेला आहे. महिलांच्या जोडीला पुरुषही ब्रेसलेट, चैन, अंगठी, हातातले कडे, कानातल्या बाळ्या यासाठी सातत्याने सोने खरेदी करत असतात. सध्या अमेरिका, इराण, इस्त्रायल असे युद्ध सुरु आहे. इंधनाच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. इंधन खरेदीसाठी परकीय चलन गरजेचे आहे. सोन्यामध्ये होत असलेली गुंततवणूक पाहता अमेरिकेकडे जात असलेले डॉलरच्या माध्यमातून परकीय चलन पाहता पंतप्रधान मोदी यांनी भारतीयांना किमान वर्षभर सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले. ही मात्रा लागू पडली. सोने खरेदी ओघ आटला. सोने खरेदीनंतर, देश प्रथम हा ट्रेंड वेगाने विकसित होत आहे. परकीय चलन देशाबाहेर जाण्याचे ध्येय बऱ्याच अंशी साध्य झाले. भारतीय समाजात सोन्याला केवळ मौल्यवान धातू म्हणून पाहिले जात नाही, तर तो प्रतिष्ठा, सुरक्षितता, संस्कृती आणि भावनिक गुंतवणुकीचे प्रतीक मानला जातो. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक परंपरा किंवा बचतीचा पर्याय म्हणून भारतात सोन्याला विशेष महत्त्व आहे. 'सोने म्हणजे सुरक्षित भविष्य' अशी मानसिकता अनेक वर्षांपासून भारतीय समाजात रुजलेली आहे. त्यामुळे देशात सोन्याची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र या वाढत्या सोन्याच्या आयातीचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता आता केंद्र सरकारकडून व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काही काळ सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केल्याची चर्चा आर्थिक आणि सामाजिक स्तरावर सुरू झाली आहे. या आवाहनामागे देशाची आर्थिक स्थिती, परकीय चलनाचा तुटवडा आणि डॉलरचा वाढता दबाव ही महत्त्वाची कारणे आहेत.

भारत हा जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या ग्राहक देशांपैकी एक मानला जातो. देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर सोने आयात केले जाते. भारतात उत्पादित होणारे सोने अत्यल्प असल्याने बहुतांश सोने परदेशातून, विशेषतः अमेरिका आणि इतर देशांतून आयात करावे लागते. या आयातीसाठी डॉलरमध्ये पैसे द्यावे लागतात. परिणामी देशातील परकीय चलनाचा मोठा साठा सोन्याच्या खरेदीसाठी खर्च होतो. याचा थेट परिणाम भारताच्या चालू खात्यातील तुटीवर आणि रुपयाच्या मूल्यावर होतो. भारतीयांना सोन्याचे आकर्षण का आहे, याची अनेक सामाजिक आणि मानसिक कारणे आहेत. ग्रामीण भागात आजही सोने हीच सर्वात सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. शेअर बाजार, म्युच्युअल फंड किंवा डिजिटल गुंतवणूक याबाबत अजूनही अनेकांना पुरेशी माहिती नाही. त्यामुळे हातात दिसणारी आणि गरजेच्या वेळी विकता येणारी मालमत्ता म्हणून सोन्याकडे पाहिले जाते. महिलांसाठी दागिने हे केवळ अलंकार नसून त्यात भावनिक आणि कौटुंबिक सुरक्षिततेची भावना जोडलेली असते. लग्नात मुलीला सोने देणे ही सामाजिक प्रतिष्ठेची बाब मानली जाते. अनेक कुटुंबे कर्ज काढूनसुद्धा सोन्याची खरेदी करतात. यामुळे 'सोन्याचे वेड' ही मानसिकता समाजात अधिक दृढ होत चालली आहे. अलीकडच्या काळात सोन्याचे दर सातत्याने वाढत असूनही खरेदीत घट झालेली दिसत नाही. उलट सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे अनेकांना ते अधिक सुरक्षित गुंतवणूक वाटू लागले आहे. आर्थिक अस्थिरता, महागाई आणि जागतिक तणावाच्या काळात लोक सोने खरेदीकडे वळतात. त्यामुळे मागणी वाढतच राहते. पण देशाच्या दृष्टीने ही स्थिती चिंताजनक आहे. कारण उत्पादनक्षम क्षेत्रात गुंतवणूक होण्याऐवजी मोठ्या प्रमाणात पैसा निष्क्रिय स्वरूपात सोन्यात अडकून राहतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते. देशातील नागरिकांनी काही काळ अनावश्यक सोन्याची खरेदी टाळली, तर देशाचा मोठा परकीय चलन खर्च वाचू शकतो. भारताला कच्चे तेल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आणि औद्योगिक उत्पादनासाठीही मोठ्या प्रमाणावर डॉलरची आवश्यकता असते. अशा वेळी सोन्यासारख्या अनुत्पादक आयातीवर होणारा खर्च कमी झाला, तर देशाचा आर्थिक समतोल सुधारण्यास मदत होऊ शकते. सोने आयात कमी झाल्यास भारताच्या परकीय चलन साठ्यावरचा दबाव कमी होईल. डॉलरची मागणी घटल्याने रुपयाचे मूल्य स्थिर राहण्यास मदत मिळू शकते. रुपया मजबूत राहिला, तर आयात खर्च कमी होतो आणि महागाई नियंत्रणात ठेवणे सरकारसाठी तुलनेने सोपे जाते. तसेच चालू खात्यातील तूट कमी झाल्यास देशाच्या आर्थिक स्थैर्याला बळ मिळते. परकीय गुंतवणूकदारांचाही भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास वाढतो.

जर नागरिकांनी सोन्याऐवजी बँक ठेवी, शेअर बाजार, म्युच्युअल फंड, सरकारी रोखे किंवा उद्योगांमध्ये गुंतवणूक केली, तर त्या पैशाचा उपयोग देशातील उत्पादन, रोजगार आणि उद्योगवाढीसाठी होऊ शकतो. अर्थव्यवस्थेत पैसा फिरत राहिल्यास विकासाला गती मिळते; परंतु मोठ्या प्रमाणावर पैसा सोन्याच्या स्वरूपात घरात किंवा लॉकरमध्ये पडून राहिला, तर त्यातून देशाच्या उत्पादन क्षमतेत कोणतीही भर पडत नाही. त्यामुळे 'मृत गुंतवणूक' अशी टीका अनेक अर्थतज्ज्ञ सोन्यावर करतात. सरकारने यापूर्वीही गोल्ड बाँड योजना, गोल्ड मॉनेटायझेशन योजना यांसारख्या पर्यायांद्वारे नागरिकांना प्रत्यक्ष सोने खरेदी टाळण्याचे प्रयत्न केले होते. मात्र भारतीय समाजातील मानसिकता बदलणे हे मोठे आव्हान आहे. लोकांना सोन्यातील भावनिक सुरक्षितता अधिक महत्त्वाची वाटते. त्यामुळे केवळ सरकारी योजना जाहीर करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी आर्थिक साक्षरता वाढवणे, गुंतवणुकीचे पर्याय समजावून सांगणे आणि समाजात नवीन आर्थिक विचार निर्माण करणे गरजेचे आहे.

माध्यमे, बँका, शैक्षणिक संस्था आणि आर्थिक तज्ज्ञ यांनीही यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. 'जास्त सोने म्हणजे जास्त सुरक्षितता' हा समज बदलून 'उत्पादनक्षम गुंतवणूक म्हणजे आर्थिक प्रगती' ही भावना समाजात रुजवावी लागेल. विशेषतः तरुण पिढीला आधुनिक आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा नाही की, सोने पूर्णपणे वाईट आहे किंवा त्याची खरेदी थांबवावीच लागेल. भारतीय संस्कृतीत सोन्याचे स्थान कायम राहणार आहे. मात्र अतिरेक टाळणे आणि गरज व गुंतवणूक यामध्ये संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. प्रतिष्ठा दाखवण्यासाठी किंवा सामाजिक दबावामुळे होणारी अनावश्यक सोन्याची खरेदी कमी झाली, तर त्याचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होऊ शकतो. आज भारत जगातील मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी प्रत्येक नागरिकाची आर्थिक सवय देशाच्या प्रगतीशी जोडली जाते. जर नागरिकांनी विवेकाने खर्च आणि गुंतवणूक केली, तर देशाचा आर्थिक पाया अधिक मजबूत होईल.

पंतप्रधानांनी केलेले आवाहन हे केवळ सोन्याबाबत नसून देशहितासाठी जबाबदार आर्थिक वर्तन करण्याचा संदेश आहे. देशाच्या विकासासाठी सरकारच्या धोरणांसोबतच नागरिकांची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. सोन्याविषयीचे आकर्षण कायम राहू शकते, पण त्याचे अतिरेकी वेड देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी घातक ठरू शकते. त्यामुळे 'देश प्रथम' ही भावना ठेवून नागरिकांनी विचारपूर्वक निर्णय घेणे, हीच आजची खरी गरज आहे.

# चला ! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेवू या!

**ज्या ज्या** वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. ‍हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला ‍ ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी-महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. 'जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा' हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबजावणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे. बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

कारण संकटे येत राहतातः पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे. तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवूया ! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया !

**– प्रवीण टाके**

# अन्न सुरक्षा, पोषण, शाश्वत शेती आणि आर्थिक संधींमध्ये बटाट्याची महत्त्वपूर्ण भूमिका

**आम्ही जगभरातील अब्जावधी लोकांनी वापरल्या जाणाऱ्या अविश्वसनीय पिकावर प्रकाश टाकणारा पहिला-वहिला आंतरराष्ट्रीय बटाटा दिवस साजरा करू. हा दिवस जागतिक अन्न सुरक्षा, पोषण, शाश्वत शेती आणि आर्थिक संधींमध्ये बटाट्याची महत्त्वपूर्ण भूमिका ओळखण्याची संधी आहे. चला उल्लेखनीय पिकांच्या जगात जाऊया. सदर महत्त्वपूर्ण संकलित लेख शेतकरीपुत्र- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींची प्रस्तुती आहे, जरूर वाचा... संपादक.**

**बटाटा** पिकाची लागवड पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, बीड, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यात केली जाते. बटाट्यामध्ये प्रथिने, चुना, फॉस्फरस या सारखी खनिजे, ब आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. बटाट्याचा उपयोग खाद्य पदार्थाशिवाय अनेक उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात होतो. बटाटा हे थंड हवामानातील पिक आहे. या पिकास सरासरी १६ ते २१ सेल्सिअस तापमान लागते. पिकाच्या सुरवातीच्या काळात २४ सेल्सिअस पोषक असून बटाटे पोसण्याच्या काळात २० सेल्सिअस तापमान अनुकूल असते. बटाटे लागवडीच्या वेळी उष्ण हवामान व बटाटे पोसण्याचे वेळी थंड हवामान या पिकास पोषक असते. मध्यम ते हलक्या गाळाच्या जमिनीत बटाट्याची लागवड चांगल्या रीतीने करता येते. जमीन कसदार भुसभुशीत व उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीचा सामू ६ ते ८च्या दरम्यान असावा. जमीन नांगरानी २० ते २५ सेंमी नांगरली जाते. १ महिनाभर जमिनीस उन्हाची ताप देणे आवश्यक असते. पुन्हा १ आडवी नांगरणी केली जाते. ढेकळे फोडण्यासाठी व जमीन समपातळीत आणण्यासाठी कुळवाच्या दोन तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करतात, जमिनीत हेक्टरी ५० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरले जाते. बटाट्याची लागवड खरीप हंगामात जून, जुलै महिन्यात करतात व रब्बी हंगामात ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात करतात. बटाटा वाण- जात प्रकार- कुफरी लवकर – ही ६५ ते ८० दिवसात तयार होणारी जात असून खरीप व रब्बी हंगामात घेतली जाते. या जातीचे बटाटे पांढरे शुभ्र आकर्षक व मोठे असतात. या जातीचा बटाटा साठवणुकीत चांगला टिकतो. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल असते. कुफरी चंद्रमुखी – ही जात ९० ते १०० दिवसात तयार होते. या जातीचे बटाटे लांबट गोल व फिकट पांढरे असतात. साठवणुकीस ही जात उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन २५० क्विंटल पर्यंत मिळते. कुफरी सिंदुरी – ही जात १२० ते १३५ दिवसात तयार होते. या जातीचा रंग फिकट तांबडा असून बटाटे मध्यम व गोल आकारचे असतात. ही जात साठवणुकीस उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन ३०० क्विंटल पर्यंत मिळते. या शिवाय कुफरी बादशाह, कुफरी कुबेर, कुफरी ज्योती, अलंकार, कुफरी चमत्कार या जाती लागवडीस योग्य आहेत.

बटाटा, ज्याचे नाव स्पॅनिश शब्द पटॅटापासून आले आहे, जगातील सर्वात सामान्य भाज्या आणि सर्वात महत्वाचे पिकांपैकी एक आहे. बटाटा ही एक अष्टपैलू भाजी आहे. हे मॅश केलेले बटाटे तांदूळ आणि परांठासोबत खाण्यास मदत करते, परंतु स्नॅक्स आणि नाश्त्याच्या डिशसाठी पॅटीज आणि हॅश ब्राऊन बनवण्यासाठी देखील याचा वापर केला जाऊ शकतो. वर्षानुवर्षे बटाट्याचा वापर विविध पदार्थ बनवण्यासाठी केला जात आहे. ही भाजी अनेक संस्कृती आणि देशांचे मुख्य अन्न आहे. बऱ्याच देशांमध्ये योग्य कारणांसाठी बटाटे मुबलक प्रमाणात घेतले जातात. हा दिवस दरवर्षी जगभरात सर्वात आवडत्या भाज्यांपैकी एकावर प्रकाश टाकण्यासाठी आणि बटाट्यापासून बनवल्या जाऊ शकणाऱ्या पाककृती आणि पदार्थांचा शोध घेण्यासाठी साजरा केला जातो. दक्षिण पेरू आणि बोलिव्हियाच्या वायव्य प्रदेशात बटाट्याची प्रथम लागवड ५००० ते ८००० बीसी दरम्यान झाली, असे मानले जाते. तेव्हापासून ही भाजी बऱ्याच देशांमध्ये आणि संस्कृतींमध्ये सर्वात पसंतीची आणि मुख्य खाद्यपदार्थांपैकी एक बनली आहे. पॅनकेक्सपासून ब्रेड रोल्सपर्यंत बटाट्याला बहुतेक पदार्थांमध्ये स्थान मिळाले आहे. बटाटे त्यांच्या पौष्टिक मूल्यासाठी देखील ओळखले जातात- हे पोषण इतर कोणत्याही अन्नपदार्थावर अवलंबून न राहता काही महिन्यांपर्यंत एखाद्या व्यक्तीला ऊर्जा प्रदान करू शकते. बटाट्यांद्वारे पुरविलेल्या कॅलरींचा स्थिर स्रोत अनेक शतके आणि देशांतील लोकांना खायला दिला आहे. बटाट्याने दक्षिण अमेरिकेत आपला प्रवास सुरू केला आणि लवकरच तो युरोप आणि देशाच्या इतर भागांमध्ये पोहोचला, जिथे तो गेला तिथे मुख्य आहाराचा एक भाग बनला. हा विशेष दिवस साजरा करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे बटाट्यांसोबत नवीन पदार्थ बनवण्याच्या शक्यतांचा शोध घेणे आणि कुटुंब आणि मित्रांसह त्याचा आनंद घेणे आहे.

**जागतिक बटाटा दिवसाचा उद्देश-** बटाटा दिनाचा उद्देश बटाटा एक बहुमुखी आणि प्रिय भाजी म्हणून त्याचे महत्त्व ओळखून साजरा करणे आणि त्याचा सन्मान करणे हा आहे. जगभरातील विविध पाककृतींमध्ये बटाट्यांचे पौष्टिक मूल्य आणि त्यांचे महत्त्व याबद्दल जागरुकता वाढवणे हा यामागचा उद्देश आहे. हा दिवस लोकांना विविध समाजांमधील बटाट्यांचा समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक प्रभाव शोधण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी प्रोत्साहित करतो. हे स्वयंपाकाच्या उत्साही लोकांना नवीन आणि सर्जनशील बटाटा पाककृती सामायिक करण्याची आणि शोधण्याची संधी प्रदान करते. हा बटाटा दिवस बटाट्याच्या कृषी महत्त्वाला मोठ्या प्रमाणावर घेतले जाणारे पीक म्हणून प्रोत्साहन देतो, अन्न सुरक्षेत योगदान देतो. उत्सव आणि सोशल मीडिया शेअरिंगद्वारे हा दिवस बटाटा उत्साही लोकांमध्ये समुदायाची भावना वाढवतो. हा दिवस कसा साजरा करायचा? तर फ्रेंच फ्राईज, मॅश केलेले बटाटे किंवा बटाटा सॅलड यांसारख्या तुमच्या आवडत्या बटाट्याचे पदार्थ शिजवा आणि त्याचा आनंद घ्या. बटाट्याच्या नवीन रेसिपी वापरून पहा आणि वेगवेगळ्या फ्लेवर्स आणि मसाला वापरून प्रयोग करा. ऑनलाइन सेलिब्रेशनमध्ये सामील होण्यासाठी सोशल मीडियावर तुमच्या सर्वोत्तम बटाट्याच्या पाककृती शेअर करा. बटाटा लागवडीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आणि स्थानिक उत्पादकांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक बटाटा फार्म किंवा शेतकऱ्यांच्या बाजाराला भेट द्या. मित्र आणि कुटुंबासह बटाटा-थीम असलेली पार्टी आयोजित करा, ज्यामध्ये बटाट्याचे विविध पदार्थ आणि मजेदार क्रियाकलाप आहेत. बटाट्याची रेसिपी बनवण्याची स्पर्धा आयोजित करा किंवा सर्वात नाविन्यपूर्ण बटाट्याची रेसिपी कोण घेऊन येईल हे पाहण्यासाठी मित्रांमध्ये आव्हान द्या. तुमच्या कुटुंबात किंवा संस्कृतीत भावनिक मूल्य असलेल्या पारंपारिक बटाट्याच्या पदार्थांची आठवण करून द्या. गरज असलेल्यांना बटाटे आणि इतर पौष्टिक पदार्थ पुरवण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या फूड बँक किंवा धर्मादाय संस्थांना जरूर भेटी द्या.

बटाटा ही वनस्पती सोलॅनेसी कुलातील असून तिचे शास्त्रीय नाव सोलॅनम ट्यूबरोजम आहे. मिरची, वांगी व टोमॅटो या वनस्पतीही याच कुलात मोडतात. जगभरात मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाणारी बटाटा ही एक खाद्य वनस्पती आहे. ती मूळची दक्षिण अमेरिकेतील पेरू आणि बोलिव्हिया देशांच्या सीमेवर असलेल्या अँडीज पर्वतातील आहे. सोळाव्या शतकात स्पॅनिश दर्यावर्दींनी ती यूरोपात आणली. पोर्तुगिजांनी भारतात पश्चिम किनाऱ्याजवळच्या प्रदेशात बटाट्याची लागवड केली. बटाट्यात असलेल्या पोषक घटकांमुळे अनेक देशांत मानवी आहारामध्ये त्याचा समावेश केला जातो. बटाटा- सोलॅनम ट्यूबरोजम- पाने आणि खोड, बटाट्याचे रोप सर्वसाधारणपणे ०x३-१x२५ मी. उंच वाढते आणि त्याचे खोड जमिनीलगत पसरते. रोपाची मुळे आगंतुक, मुख्य खोडाच्या पेरावर व जमिनीलगतच्या थरात वाढणारी असतात. खोड लहान, मऊ, जांभळ्या-हिरव्या रंगाचे, त्रिकोणाकृती व पोकळ असते. याच्या शाखांना भूस्तरिका म्हणतात व त्या जमिनीलगत वाढतात. त्यांच्या टोकाला अन्नसंचय झाल्यामुळे ते खोड फुगते आणि मोठे होते. हे फुगलेले खोड म्हणजे बटाटा. बटाट्यावरील डोळे म्हणजे पेरावरील कक्षस्थ कलिका आहेत. बटाट्याची साल पातळ, फिकट पिवळी, क्वचित लाल किंवा जांभळी असते. पाने संयुक्त, लवदार व पिच्छाकृती असून टोकाची पर्णिका मोठी असते. फुले पांढरी व विविधरंगी असून वल्लरीत येतात. पांढरी फुले असलेल्या क्षुपाचे बटाटे पांढऱ्या सालीचे असतात, तर रंगीत फुलांच्या बटाट्यांची साल गुलाबी, लाल, निळी किंवा जांभळी असते. मृदुफळे हिरवी, गोलसर १x५-२x५ सेंमी. व्यासाची असून त्यांत अनेक चपट्या बिया असतात. त्या बिया विषारी असतात. जगात सर्वत्र मिळून बटाट्याचे सु. ५,००० वाण आहेत. त्यांपैकी सु. ३,००० वाण पेरू, चिली, बोलिव्हिया, एक्वादोर आणि कोलंबिया या देशांत दिसून येतात. सो. ट्यूबरोजम ही जाती आणि तिच्यापासून तयार केलेले आधुनिक वाण यांचीच लागवड जगात मोठ्या प्रमाणावर केली जाते. बटाट्याची लागवड शाकीय पद्धतीने म्हणजे ग्रंथिक्षोडाचे तुकडे लावून करतात. प्रत्येक तुकड्यावर किमान दोन डोळे असावे लागतात. चीनमध्ये बटाट्याची लागवड सर्वाधिक केली जात असून त्यानंतर भारत, रशिया, युक्रेन आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशांचा क्रम लागतो. बटाट्यात ७५ टक्के पाणी आणि २० टक्के स्टार्च हे दोन मुख्य घटक आहेत. यांशिवाय त्यात काही प्रथिने, कॅल्शियम, क जीवनसत्त्व आणि ब समूह जीवनसत्त्वांपैकी निअॅसीन असते. बटाटा हे लवकर पचणारे अन्न आहे. बटाटा उकडून किंवा तळून त्यापासून वेगवेगळे अन्नपदार्थ बनविले जातात. भारतात बटाट्यापासून तयार केलेले वडे, भाजी आणि वेफर मोठ्या प्रमाणावर खाल्ले जातात. उकडलेल्या बटाट्याची साल भारतीय उपचार पद्धतीत भाजलेली जखम बरी करण्यासाठी लावतात. बटाट्यातील स्टार्चचा उपयोग वस्त्र-उद्योगात तसेच व्होडका हे मद्य तयार करण्यासाठी होतो.

!! आंतरराष्ट्रीय बटाटा दिनानिमित्त समस्त शेतकरी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

– संकलन व सुलेखन –

**शेतकरीपुत्र- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली जि. गडचिरोली.
फक्त दूरभाष- ९६९९८३६७१७.

# समाजाच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन

## ॲड. अशोक राठोड यांचे बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – येथे ऑल इंडिया बंजारा टायगर्सचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अशोक राठोड यांनी बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १८ मे पासून आमरण उपोषण छेडले आहे. त्यांच्या या आमरण उपोषणाला समाजाच्या प्रत्येक घटकाने पाठिंबा दिला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित या आंदोलनात समाजाच्या आरक्षण, आर्थिक विकास, शिक्षण



आणि तांडा विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मागण्या शासनापुढे उपोषणाच्या माध्यमातून मांडण्यात आल्या.

आंदोलनकर्त्यांनी बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी केली असून, तिसऱ्या अनुसूचीची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेसाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय वसंतराव नाईक महामंडळाच्या भांडवलात वाढ करून बेरोजगार युवकांना अधिक कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी आंदोलकांनी केली. थकीत कर्ज माफी, नवीन कर्ज योजना, तसेच बोगस जात प्रमाणपत्रधारकांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

आंदोलनाचे नेतृत्व ऑल इंडिया बंजारा टायगर्सचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अशोक राठोड हे करत आहे. समाजाच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# ईद-उल-अजहा(बकरी ईद) बाबत समज गैरसमज... इंजिनिअर वहिद यांच्या लेखणीतून...!

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – बकरी ईद -सणाला हल्ली काही जातीवादी मानसिकतेचे लोक हे सामाजिक विषमतेच्या दृष्टिकोनातून बघत असताना दिसू लागले ही एक वास्तवाविकता असून शोकांतिका सुद्धा आहे. आश्चर्यकारक आहे.

भारत हा विविध धर्म, संस्कृती आणि परंपरांचा देश आहे. येथे प्रत्येक धर्माचा सण केवळ त्या समाजापुरता मर्यादित नसून सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा असतो. मुस्लिम समाजातील पवित्र आणि महत्त्वपूर्ण सणांपैकी एक म्हणजे ईद-उल-अजहा. फक्त भारतातील ग्रामीण भागात या सणाला बकरी ईद म्हणून संबोधले जाते.

तीन धर्मांचे प्रेषित (यहूदी, ख्रिश्चन, इस्लाम) यांनी १५००० वर्षापूर्वी भगवंताच्या आज्ञा होती म्हणून कुर्बानी दिली तेव्हापासून कुर्बानी दिली जाते.भगवंतप्रेषित इब्राहिम अलै सलाम ज्यांना यहूदी (इस्राईली) धर्माचे लोक प्रेषित मानतात, ख्रिश्चन व मुस्लिम धर्माचे लोक सुद्धा प्रेषित मानतात त्याचे कारण ही सिद्ध व सत्य आहेत ते असे की त्याच्या ४० पिढ्या यहूदी धर्माचे पालन करायचे नंतर ४१ व्या पिढीत येशू ख्रिस्त यांनी जन्म घेतला. ख्रिश्चन धर्म उदयास आला. जगभरात मोठी फूट झाली. काही मूर्तिपूजक गट निर्माण झाला. (मुख्यत्वे अरबी राष्ट्रातील). ते सुद्धा आपल्या मूर्ती समोर कुर्बानी द्यायचे.. परत ४० पिढ्या नंतर ४१व्या मूर्तिपूजक पिढीत प्रेषित मुहम्मद सल्लाहो अलैव सल्लम यांनी जन्म घेतला व अरब राष्ट्रात इस्लाम धर्माची स्थापना केली.ईद उज जुहा या दीनी कुर्बानी ही प्रथा असून कुर्बानी म्हणजेच ईद साजरी करणे असे नव्हे. प्रथम प्रेषित इब्राहिम ते अंतिम प्रेषित मुहम्मद (स. अ.स.)ते आजपर्यंत असा १५००० वर्षाचा कुर्बानी प्रथेचा आस्था प्रवास आहे. काही लोकांनी या सणाकडे केवळ प्राण्यांच्या कुर्बानीच्या दृष्टिकोनातून पाहण्यास सुरुवात केली. परिणामी समाजात टीका, गैरसमज दिसतात. परंतु प्रत्यक्षात ईद-उल-अजहाचा मूलभूत संदेश हा त्याग, श्रद्धा, आज्ञापालन आहे. हा सण केवळ कुर्बानी पुरता मर्यादित नसून माणसाने आपल्या स्वार्थ, अहंकार, वाईट प्रवृत्ती आणि लोभावर मात करण्याचा संदेश देतो.

ईद-उल-अजहा म्हणजे नेमके काय? हे समजून घेणे महत्वाचे आहे. अजहा या अरबी शब्दाचा अर्थ आहे. त्याग किंवा बलिदान. ईद-उल-अजहा हा यहूदी ख्रिश्चन इस्लाम धर्मा नुसार, अल्लाहने पैगंबर इब्राहिम यांची परीक्षा घेतली. त्यांना आपल्या अत्यंत प्रिय मुलाचा त्याग करून एकांतवास मध्ये मुलाला आणून त्याची कुर्बानी करा असा आदेश दिला. ते पालन करतात किंवा नाही याची परीक्षा होती. त्यांनी लहान मुलाला कुर्बानी साठी सांगितलेल्या जागी आणले त्यावेळेस त्यांना हातात सूरी घेऊन मुलाच्या मानेवर सूरी चालवीण्याचे आदेशीत होताच त्यांचे हाथ थरथरू लागले पण त्यांनी देव आदेश पालन म्हणून सूरी चालविली त्यावेळेस चमत्कार झाला त्याच्या मुलाच्या ठिकाणी बकरा कुर्बान झाला आणि डोळ्याला पट्टी बांधलेला मुलगा सुरक्षित राहिला. हा प्रसंग मानवाला शिकवतो की ईश्वरनिष्ठा, आणि सर्वोच्च समर्पण हे जीवनातील अंतिम सत्य आहे.

ईद-उल-अजहाच्या वेळी बकरीची कुर्बानी देतात म्हणून सामान्य बोलचालीत बकरी ईद हे नाव रूढ झाले. गायीची बैलाची कुर्बानी करण्यासाठी कोठेही उल्लेख नाही ती केलीच तर दुय्यम मानली जाते कारण प्रेषित इब्राहिम यांच्या दैवीक चमत्काराच्या वेळेस दुम्बा (बकरा ) ची कुर्बानी झाली.

परंतु हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, ईद-उल-अजहा म्हणजे केवळ मांसाहार किंवा प्राण्यांची कत्तल असा संकुचित अर्थ नसून प्रेषित इब्राहिम यांनी भगवान आज्ञा पालनास्तव जी त्यागाची तयारी दर्शविली त्याची आठवण करणे हा आहे.

जसे दिवाळीचा अर्थ फक्त फटाके नसतो, होळीचा अर्थ फक्त रंग नसतो किंवा गणेशोत्सवाचा अर्थ फक्त मिरवणूक नसतो; त्याचप्रमाणे ईद-उल-अजहाचाही अर्थ फक्त कुर्बानी नाही.फक्त २५ ते ३०%लोक आप आपल्या आर्थिक परिस्थिती नुसार कुर्बानी देतात. निसर्ग प्राणी समतोल अभ्यास व संशोधन, कोलकत्ता या संस्थे च्या अहवाला नुसार दर रोज ची मांसाहार गरज भागविण्यासाठी भारतात दर रोज १. २ ते १.५ लाख बकरे कापले जातात. बकरा उद्योग मध्ये भारतात दररोज ३०० कोटी ची उलाढाल होते.

लोकसंख्या १४० कोटी पैकी मांसाहार करणारे ७५ कोटी जनतेपैकी १५ कोटी मुस्लिम आहेत. जर भारतात मांसाहार गरज भागविण्यासाठी महिन्याकाठी ५० लाख बकरे कापली जातं असतांना ईद च्या दिवशी धार्मिक विधि कुर्बानी साठी कापल्या जाणाऱ्या २० ते २५ लाख बकरा कुर्बानीच्या विरोधात राजकीय रंग देण्याचा प्रयत्न का? या मध्ये राजकारण निर्माण करून काही राजकीय पार्टी केवल द्वेष निर्माण करीत आहे.

कष्टाच्या रक्कमतून बकरा खरेदीकरून कुर्बानी करणाऱ्या मुस्लिम लोकांबाबत जे तिरस्कार जातीभेद निर्माण करतात त्यांनी स्वतः च्या मनाला प्रश्न विचारावा केवल मुस्लिमच मटण खातात का?भारतातील जवळपास ३०० जत्रेमध्ये सुद्धा कंदोरी (कुर्बानी ) दिली जाते मग बकरी ईद सणाबाबत सोशलमीडिया वर जातीवादी भूमिका का?

–इंजि. शेख वहीद
(छत्रपती संभाजीनगर )

# महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र एआय क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला.मुंबईतील बीकेसी येथे 'मुंबई टेक विक २०२६' चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिले. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त डॉ.संजय भिडे, महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, तसेच प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.महाराष्ट्र शासनाने १० हजार कोटी रुपयांची एआय गुंतवणूक, दीड लाख रोजगार निर्मिती, सहा 'सेंटर ऑफ एक्सलन्स' आणि विशेष 'एआय इनोव्हेशन क्षेत्रे' उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआय क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राज्य सरकार 'कम्प्युट-अॅज-अ-सर्व्हिस' सुविधा निर्माण करत आहे. त्याद्वारे नवउद्योजक आणि संशोधकांना २ हजार जीपीयू उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उच्च क्षमतेच्या कम्प्युटिंग सुविधा परवडत नसल्यास नवकल्पना थांबते. त्यामुळे महाराष्ट्र शासन थेट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सरकार फक्त धोरणात्मक चौकट तयार करू शकते; पण खरी स्टार्टअप परिसंस्था संस्थापक आणि उद्योजक घडवतात. डिसेंबर २०२२ मध्ये टेक उद्योजकांच्या संघटनेची संकल्पना प्रथम मांडण्यात आली होती, त्यावेळीच त्यांच्या कामातील ऊर्जा आणि दृष्टी पाहून हा उपक्रम मोठा होईल, असा विश्वास वाटला.आता प्रत्येक वर्षी अधिकाधिक संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्या महाराष्ट्राशी जोडल्या जात आहेत. सलग तीन वर्षे महाराष्ट्र हा गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येनुसार देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशभरातून आणि विदेशातून मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना उद्देशून मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीचे आवाहन केले. आणि ते म्हणाले इततंत्रज्ञान आणि एआय क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम काळ आहे आणि महाराष्ट्र ही सर्वोत्तम कार्यभूमी आहे. येथे आधीच सक्षम परिसंस्था तयार झाली आहे. महाराष्ट्रासाठी काम करा, भारतासाठी काम करा आणि जगासाठी नवकल्पना घडवा.

राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि अॅक्सेलेरेशनपुरते मर्यादित नसून 'फंड ऑफ फंड्स'च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्या सोबत उभे राहण्यास तयार आहे, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये एआयच्या वाढत्या वापराची उदाहरणे देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'महा-विस्तार' या शेतकरी अॅपचा विशेष उल्लेख केला. हे शेतकऱ्यांसाठी एक 'वन स्टॉप सोल्युशन' आहे. भारत आय परिषदेत केंद्र सरकारने त्याला देशातील सर्वोत्तम शेतकरी उपाय म्हणून गौरविले आहे. आता 'इंडिया-विस्तार' संकल्पना त्याच धर्तीवर विकसित होत आहे. तसेच बांधकाम परवानगी प्रक्रियेत एआय आधारित प्रणालीमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गुन्हे तपास आणि न्यायप्रक्रियेसाठी तयार करण्यात आलेल्या 'क्राईम ओएस' प्लॅटफॉर्मचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रणालीमुळे तपास, चार्जशीट तयार करणे आणि न्यायालयीन प्रक्रिया अत्यंत वेगवान होणार आहे. पूर्वी १५ हजार पानांच्या आरोपपत्रासाठी तीन-चार महिने लागत; आता एआयमुळे ते दहा-बारा दिवसांत शक्य होणार आहे.वैद्यकीय विमा योजनातील गैरव्यवहार शोधणे, एचआर स्टँडर्ड्स शासकीय मनुष्यबळ व्यवस्थापन सुधारणे, वाहतूक नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आणि निगराणी व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांतही एआयचा प्रभावी वापर सुरू आहे. राज्य सरकारने विविध विभागांसाठी ५० एआय इंजिन विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

एआयच्या वेगवान विस्तारासोबत निर्माण होणाऱ्या 'डीपफेक', डेटा सुरक्षा आणि विश्वासार्हतेच्या प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, इथिकल एआयबद्दल हीच राज्याच्या धोरणाची मध्यवर्ती संकल्पना आहे. एआय सर्वांसाठी उपलब्ध असला पाहिजे. तो केवळ मोठ्या कंपन्यांचा विशेषाधिकार राहता कामा नये. एमएसएमईनाही त्याचा लाभ मिळायला हवा, तसेच एआयमध्ये मानवी हस्तक्षेप आणि मानवी मूल्ये केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. असेही प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

# समाजात शांतता, बंधुता आणि शिक्षणातूनच खरी समानता निर्माण होऊ शकते – प्रवीण बागडे

नागपूर, दि. २९ (प्रतिनिधी) – लष्करीबाग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृहात शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी बहुजन हिताय संघाची ४७१ वी साप्ताहिक सभा उत्साहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय विभागाचे माजी उपायुक्त मा. आयु. संजीव गाडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रशासनिक अधिकारी, साहित्यिक, लेखक व कवी मा. आयु. प्रवीण बागडे उपस्थित होते, तर विशेष अतिथी म्हणून मा. आयु. अशोक बागुल यांनी उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाची सुरवात तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्रिशरण, पंचशील आणि बुद्धवंदनेने करण्यात आली. बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी आनापानसती ध्यानाचे मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी प्रवीण बागडे यांनी उपस्थितांकडून बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या. आपल्या मनोगतात प्रवीण बागडे यांनी समाजात शांतता, बंधुता आणि सामाजिक एकात्मता प्रस्थापित करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

'शिक्षणामुळेच खरी सामाजिक समानता निर्माण होऊ शकते,' असे प्रतिपादन करत त्यांनी शिक्षण क्षेत्रातील वाढत्या बाजारीकरणाबाबत चिंता व्यक्त केली. त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व प्रबोधनात्मक कार्याचा गौरव संस्थेच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.

सभेत विविध मान्यवरांनी धम्म, समाजप्रबोधन, शिक्षण आणि सामाजिक ऐक्य या विषयांवर मार्गदर्शन केले. विशेष अतिथी अशोक बागुल यांनी बहुजन हिताय संघ हा मानवतावादी विचार जोपासणारा सामाजिक संघ असल्याचे सांगत, 'जाती-धर्मांच्या आधारावर माणसाचे मूल्यांकन करू नये. जाती, धर्म आणि पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवता प्रस्थापित करणे आवश्यक आहे, असा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात संजीव गाडे यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्यासाठी विधिवत दीक्षा आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आणि सामाजिक मूल्यांवर मार्गदर्शन केले. 'दिनविशेष' अंतर्गत आयु. प्रकाश सोनटक्के यांनी दि. १६ ते २३ मे या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती दिली. तसेच दि. २४ ते ३० मे दरम्यान वाढदिवस असलेल्या धम्मसेवक-धम्मसेविकांना आयु. ज्ञानेश्वर वाकडे यांनी शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. शारदाताई मोटघरे यांनी श्रीलंकेतील बौद्ध धम्म, तेथील शिस्त आणि धम्म पालन याविषयी माहिती दिली, तर आयु. हरिश कावरे यांनी काव्याच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत शिंगोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन चुन्नीलाल जांभूळकर यांनी मानले. समापन गाथा प्रा. नंदाताई भगत यांनी सादर केली. वर्षाताई टेंभेकर, मंगलाताई राऊत आणि संगीताताई पानतावणे यांनी राष्ट्रगीत सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

# निम्मे मंत्रालय एअर इंडियाच्या इमारतीत होणार स्थलांतरित

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – मंत्रालयातील वाढती गर्दी आणि जागेअभावी विविध शासकीय विभागांसाठी आसपासच्या इमारतींचे भाडे भरताना तिजोरीवर पडणारा दरवर्षीचा २०० कोटींचा बोजा आता कायमचा थांबणार आहे. नरिमन पॉईंट येथील समुद्रकिनाऱ्यालगत असलेली एअर इंडियाची २३ मजली इमारत अखेर महाराष्ट्र सरकारच्या ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा झाला असून, यासाठी वित्त विभागाने १ हजार ६०१ कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला आहे. ही खरेदी प्रक्रिया पूर्ण होताच मंत्रालयातील जवळपास निम्मी कार्यालये या इमारतीत स्थलांतरित केली जाणार आहेत. समुद्रकिनाऱ्यालगतच्या या आलिशान इमारतीमधील 'सी व्ह्यू' (समुद्र दर्शन) असणाऱ्या केबिन्स आपल्याच पदरात पाडून घेण्यासाठी आत्तापासूनच अनेक बड्या मंत्र्यांनी जोरदार लॉबिंग सुरू केले आहे.गेल्या काही वर्षांपासून एअर इंडियाच्या इमारत खरेदीचा प्रस्ताव विविध कारणांमुळे प्रलंबित होता. मात्र, आता या प्रक्रियेला कमालीचा वेग आला आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मुंबई इलाखा शहर विभागाने कायदेशीर बाबी पूर्ण करण्यासाठी विशेष कायदा सल्लागाराची नेमणूक केली असून, खरेदी खताचा अंतिम मसुदा विधी व न्याय विभागाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. पुढील आठवड्याभरात 'ए. आय. अॅसेट हॉल्डिंग कंपनी'सोबत अंतिम खरेदी करार संपन्न होणार असून, त्यानंतर अधिकृतपणे ही इमारत राज्य सरकारकडे हस्तांतरित केली जाईल. न्यूयॉर्कमधील नामांकित वास्तुविशारद जॉन बुर्गी यांनी डिझाइन केलेली आणि १९७४ मध्ये राज्य सरकारच्याच जमिनीवर उभारण्यात आलेली ही वास्तू नरिमन पॉईंट परिसरातील प्रमुख आकर्षण आहे. या २३ मजली इमारतीमुळे शासनाला तब्बल ४६ हजार ४७० चौरस मीटरची प्रशस्त जागा उपलब्ध होणार आहे. सध्या मंत्रालयात मंत्र्यांच्या दालनांसाठी आणि अभ्यागतांसाठी जागा अत्यंत अपुरी पडत आहे. एअर इंडियाच्या इमारतीतून अरबी समुद्राचा नयनरम्य परिसर दिसत असल्याने, स्वतःचे कार्यालय या इमारतीत हलवण्यासाठी अनेक मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकडे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

भाड्यापोटी जाणारे २०० कोटी वाचणार मंत्रालयातील जागेच्या टंचाईमुळे सध्या राज्य सरकारचे अनेक महत्त्वाचे विभाग फोर्ट आणि नरिमन पॉईंट परिसरातील खासगी इमारतींमध्ये भाड्याने चालवले जात आहेत. यासाठी सरकारला दरवर्षी २०० कोटी रुपयांहून अधिक भाडे मोजावे लागते. हा विनाकारण होणारा खर्च वाचवण्यासाठी मुख्य सचिवांनी ही इमारत लवकरात लवकर ताब्यात घेण्यासाठी विशेष पाठपुरावा केला होता, ज्याला आता यश आले आहे.

'महाव्हिस्टा' प्रकल्पाला गती मिळणार एअर इंडियाची इमारत ताब्यात आल्यानंतर राज्याच्या बहुप्रतिक्षित 'महाव्हिस्टा' प्रकल्पाला मोठी गती मिळणार आहे. नवी दिल्लीतील 'सेंट्रल व्हिस्टा'च्या धर्तीवर मुंबईतही मंत्रालय, विधानभवन, मंत्र्यांचे बंगले आणि शासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने या सुमारे १५ एकर परिसराचा पुनर्विकास करून अत्याधुनिक 'महाव्हिस्टा' प्रकल्प साकारण्याचा महायुती सरकारचा मानस आहे.२०२९ च्या आगामी निवडणुकांपूर्वी राज्यातील मतदारसंघांची पुनर्रचना होणार असल्याने विधानसभा आणि विधानपरिषदेतील आमदारांची संख्या वाढणार आहे. विद्यमान विधानभवन इमारतीत नवीन आमदारांसाठी जागा अपुरी पडणार असल्याने तिथे फारसे बदल करणे शक्य नाही. त्यामुळे महाव्हिस्टा' अंतर्गत नवे अत्याधुनिक विधानभवन, भव्य प्रशासकीय भवन (मंत्रालय), मंत्र्यांसाठी उत्तुंग निवासी टॉवर आणि प्रशस्त वाहनतळ उभारले जाणार आहे. नवीन सीआरझेड नियमांनुसार इमारतींच्या उंचीची अडचण येणार नसल्याने या जागेचा पुरेपूर वापर केला जाईल. या महाप्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना मंत्रालयाचे कामकाज विस्कळीत होऊ नये, यासाठी तात्पुरती सोय म्हणून एअर इंडियाची ही नवनिर्वाचित इमारत अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# दृश्यम ३ चा बॉक्स ऑफिसवर धूमधडाका; अवघ्या ४८ तासांत ६ सिनेमांना मागे टाकत केली रेकॉर्डब्रेक कमाई



मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – दृश्यम ३ ने रिलीज होताच बॉक्स ऑफिसवर वादळ निर्माण केले आहे. (मोहनलाला) यांच्या या बहुप्रतिक्षित चित्रपटाला प्रेक्षकांकडून तुफान प्रतिसाद मिळाला आहे. अवघ्या दोन दिवसांत सिनेमाने कमाईचे अनेक विक्रम मोडले आहेत. सस्पेन्स, थ्रिल आणि दमदार स्टोरी लाईनमुळे प्रेक्षकांनी चित्रपटाला डोक्यावर घेतले आहे. दिग्दर्शक जीतू जोसेफ यांच्या या चित्रपटाची रिलीज होण्यापूर्वीच जोरदार चर्चा रंगली होती. अॅडव्हान्स बुकिंगमध्येही सिनेमाने दमदार प्रतिसाद मिळाला होता.

**दोन दिवसांत किती कमाई?**

पहिल्याच दिवशी दृश्यम ३ ने १५.८५ कोटी रुपयांची शानदार ओपनिंग केली आहे. दुसऱ्या दिवशी कमाईत किंचित घट झाली असली, तरी चित्रपटाने ११.०५ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले. रिपोर्टनुसार, दोन दिवसांत चित्रपटाचे भारतातील कलेक्शन २६.९० कोटी रुपयांवर पोहोचले आहे, तर ग्रॉस कलेक्शन ३१.१८ कोटी रुपये झाले आहे.

**विदेशातही मोहनलालचा दबदबा**

भारतात कमाईत थोडी घसरण झाली असली, तरी परदेशात मात्र सिनेमाचा जलवा कायम आहे. दुसऱ्याच दिवशी चित्रपटाने विदेशात जवळपास २० कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे चित्रपटाची एकूण ओव्हरसीज कमाई ४५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. याचबरोबर दृश्यम ३ चे वर्ल्डवाइड कलेक्शन अवघ्या दोन दिवसांत ७६ कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. त्यामुळे या चित्रपटाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा होत आहे.

६ सिनेमांना टाकले मागे दृश्यम ३ ने अवघ्या दोन दिवसात सर्वाधिक कमाई करणाऱ्या सिनेमांच्या गटात प्रवेश केला आहे. सध्या २०२६ मध्ये सर्वाधिक कमाई करणाऱ्या सिनेमांच्या यादीत वाझा २, आडू २ आणि पॅट्रियट या सिनेमांचा समावेश आहे. याच्यानंतर आता दृश्यम ३ ने स्थान मिळवले आहे.

**२०२६ मध्ये सर्वाधिक कमाई करणारे टॉप १० सिनेमा**

वाझा २: २३८.४६ कोटी आडू ३: १२१.३१ कोटी पॅट्रियट: ८०.५१ कोटी दृश्यम ३: ७६ – ७८ कोटी (२ दिवस ) अथिराडी: ५४.६९ कोटी भरतनाट्यम २ मोहिनीअट्टम: ४०.६३ कोटी चथा पाचा: ३३.४७ कोटी प्रकम्बनम: २०.८६ कोटी पल्लीचट्टंबी: १४.४९ कोटी आशाकाल आयराम: १२.७१ कोटी

**सोशल मीडियावरही तुफान चर्चा** – सोशल मीडियावरही दृश्यम ३ ची जोरदार चर्चा सुरू आहे. मोहनलालच्या अॅक्टिंगचे विशेष कौतुक होत आहे. अनेकांनी या चित्रपटाला दृश्यम फ्रँचायझीतील सर्वात दमदार भाग असल्याचे म्हटले आहे. आता येत्या काही दिवसांत दृश्यम ३ आणखी कोणते मोठे रेकॉर्ड मोडतो, याकडे संपूर्ण चित्रपटविश्वाचे लक्ष लागले आहे.

# पुणे विषारी दारू प्रकरणातील एकाही आरोपीला सोडू नका! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोलीस आयुक्तांना निर्देश

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – पुणे आणि पिंपरी-चिंचवड औद्योगिक नगरीला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारू प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेत आतापर्यंत १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने दोन्ही शहरांत भीतीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या पोलीस आयुक्तांशी संपर्क साधून या प्रकरणातील एकाही दोषीला सोडू नका आणि आरोपींवर कठोर कारवाई करा, असे निर्देश दिले आहेत.

**कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही**

वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी या कारवाईची माहिती दिली. ते म्हणाले, 'मी पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या दोन्ही पोलीस आयुक्तांशी सविस्तर चर्चा केली आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या मुळाशी जाऊन तपास करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तपासात कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. दोन्ही आयुक्तांनी आपसात योग्य समन्वय ठेवून काम करावे आणि मृत्यूच्या नेमक्या कारणांचा तात्काळ शोध घ्यावा,' असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

राज्याला हादरवून सोडणाऱ्या या घटनेनंतर पोलिसांनी गुरुवारी रात्रीपासूनच संपूर्ण यंत्रणा कामाला लावून तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाचा तपास अधिक गतीने व्हावा यासाठी राज्य उत्पादन शुल्क (अबकारी) विभागही पोलिसांच्या सोबतीने मैदानात उतरला असून, संशयित ठिकाणांवर छापेमारी सुरू करण्यात आली आहे. या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार कर्नल विरखा सिंग याच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले असून, त्याच्यासह इतर ८ आरोपींनाही अटक करण्यात आली आहे. या सर्व ९ आरोपींवर कायद्यातील अत्यंत कठोर कलमांअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून, या बेकायदेशीर व्यवसायाची पाळेमुळे खणून काढण्यासाठी पोलिसांनी रात्रीतूनच मोठी मोहीम हाती घेतली आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११९२९/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे), औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. ९३२५२११९०९, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फिचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहर, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायक्षेत्र)

# दिवाळीपर्यंत आर्ट गॅलरी तयार करून देणार-महापौर समीर राजूरकर

## चित्रकला स्पर्धेत ग्रुप मध्ये आदित्य काचवेवार, शिवानी राजगुरू, सुप्रिया चव्हाण प्रथम; २२७ स्पर्धकांचा सहभाग





छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- 'आपला वारसा आपली संस्कृती' विषयावर जीएच रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक यूनिवर्सिटी, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका, औरंगाबाद फोटोग्राफर असोसिएशन, आणि जिल्हा मराठी पत्रकार संघ, छत्रपती संभाजीनगर यांच्या विद्यमाने चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये २२७ स्पर्धकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यावेळी महापौर समीर राजूरकर, उपायुक्त अंकुश पांढरे, जी एल रायसोनी विद्यापीठाचे डीन डॉ. अविनाश काटे, प्रशासन अधिकारी तथा मुख्याध्यापक संजीव सोनार, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद काकडे, सचिव देव शेजुळ, प्रमोद अडसुळे, फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्ष किशोर निकम यांच्या शुभहस्ते पारितोषिक देण्यात आले.

यावेळी किशोर निकम यांनी प्रस्तावना करताना सांगितले शहरांमध्ये एकही आर्ट गॅलरी उपलब्ध नसल्यामुळे चित्रकलेचे प्रदर्शन ठेवता येत नाही. ङयावेळी महापौर समीर राजुरकरानी अध्यक्षीय भाषण करताना सांगितले की दिवाळीपर्यंत आम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये तुम्हाला एक हॉलमध्ये आर्ट गॅलरी तयार करून देऊ असे आश्वासन दिलेङ

या स्पर्धेचे परीक्षण प्रा. महेश शिरसागर, विद्या सागर, वैशाली टाकळकर, प्रा. स्वाती देशपांडे प्रा. महेंद्र खाजेकर यांनी केले. निकाल वाचन वैशाली टाकळकर यांनी केले असून प्रास्ताविक व आभार प्रदर्शन किशोर निकम यांनी केले. प्रा. देवेंद्र पोटदुखे, भारत पुसे, सचिन लव्हेरा, सुनील गोरे, सुरेश देशपांडे यांनी स्पर्धेसाठी मेहनत घेतली

**परितोषिक विजेते**

**ग्रुपच अ -** प्रथम आदित्य काचवेवार, द्वितीय प्रद्युगन अंजनकर, तृतीय सावनी बडे, उत्तेजनार्थ प्रथम विभागून अन्वी खोडे, ईशावरी चल वारी, आराध्या चाफले, सुशांत गोटे,

**ग्रुप बी -** प्रथम शिवानी राजगुरू, द्वितीय सोहम सुनिल गोरे, तृतीय रुद्रानी देशपांडे, उत्तेजनार्थ प्रथम विभागून मृणाल कुमार, मृणाल वाढेकर, सावित्र वाकळे, आदित्य अरख,

**ग्रुप सी -** प्रथम सुप्रिया चव्हाण, द्वितीय मच्छिंद्र भोई, तृतीय रवींद्र वाकले, उत्तेजनार्थ विभागून विनोद भोरे, अतुल पवार, अनिकेत शिंदे, राधा अंजनकर.

# खामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला गती; प्रदूषणमुक्त, स्वच्छ व सुशोभित नदीसाठी आयुक्तांचे तातडीचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- खामनदीला पुन्हा एकदा तिचे नैसर्गिक सौंदर्य आणि ऐतिहासिक वैभव प्राप्त करून देण्यासाठी सुरू असलेल्या खामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामांचा आज सकाळी आयुक्त अमोल येडगे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. सकाळी ६.३० ते ९.०० या वेळेत झालेल्या पाहणीत उप आयुक्त-५ तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधिकारी डॉक्टर विजय पाटील तसेच विशेष कार्य अधिकारी (खामनदी प्रकल्प) असदउल्ला खान उपस्थित होते.

पाहणी दरम्यान प्रकल्पांतर्गत पूर्ण झालेल्या कामांसह प्रगतीपथावरील विविध कामांची तपासणी करण्यात आली. यावेळी नदीपात्रातील प्रदूषण, अतिक्रमणे, कचरा व्यवस्थापन, संरक्षण भिंतींची स्थिती तसेच मनुष्यबळाची कमतरता आदी बाबी निदर्शनास आल्याने संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पाहणीत अनेक ठिकाणी दूषित व दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचे तसेच नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर कचरा वाहून येत असल्याचे आढळून आले. काही नागरिकांनी त्यांच्या माल मत्तींची मलनिस्सारण व्यवस्था अधिकृत ड्रेनेज यंत्रणेशी न जोडता थेट नदीत सोडल्याचेही निदर्शनास आले. तसेच भूमिगत गटार योजनेतील तुटलेल्या चेंबरमधूनही सांडपाणी नदीत मिसळत असल्याचे आढळल्याने अशा प्रकारचे प्रदूषण तात्काळ थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.

नदीपात्रालगतच्या वसाहतींमधील कचरा संकलन अधिक नियमित करण्याबरोबरच नागरिकांना नदीत कचरा टाकण्यास प्रतिबंध घालण्याच्या सूचना देण्यात आल्या. नदीपात्रातील आणि नदीकाठावरील अतिक्रमणांबाबत नगररचना विभाग व अतिक्रमण विभागाने समन्वय साधून तातडीने कारवाई करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

पाहणी दरम्यान नदीकाठावरील दगडी पिचिंगची काही ठिकाणी दुरवस्था झाल्याचे आढळून आले. आगामी पावसाळ्याचा विचार करून पोकलेन आणि इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने दगडांची दुरुस्ती व मजबुतीकरण तातडीने करण्याचे आदेश देण्यात आले.

पानचक्की परिसरातील काही दुकानदारांकडून तसेच वक्फ बोर्ड कार्यालय परिसरातून नदीपात्रात कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर संबंधितांना नोटिसा बजावून महानगरपालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेचा वापर करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. तसेच वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक आयोजित करून खामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पात त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.

नदीपात्रातील वाढलेली जंगली झाडे व झुडपे यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळला जात असून कचरा साचण्यास मदत होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी ही झुडपे काढून नदीपात्र स्वच्छ करण्याचे निर्देश उद्यान विभागाला देण्यात आले आहेत.

प्रकल्पासाठी आवश्यक मनुष्यबळाची कमतरता देखील पाहणीत समोर आली. सध्या प्रकल्पावर अत्यल्प कर्मचारी कार्यरत असल्याने दहा कंत्राटी मजूरांची तातडीने नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच कामांना अधिक वेग देण्यासाठी अतिरिक्त पोकलेन मशीन चालकासह उपलब्ध करून देण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

खामनदीचे पुनरुज्जीवन हे केवळ महानगरपालिकेचे काम नसून जनसहभागातून उभा राहणारा पर्यावरण संवर्धनाचा व्यापक उपक्रम असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. नदी प्रदूषण रोखणे, स्वच्छता राखणे आणि नदी परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, एनसीसी तसेच विविध सामाजिक संघटनांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

खामनदीचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन हे शहराच्या पर्यावरणीय आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून आगामी काळात या प्रकल्पातील कामांना अधिक गती देऊन नदीला प्रदूषणमुक्त, स्वच्छ आणि आकर्षक स्वरूप देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे आयुक्त अमोल येडगे यांनी स्पष्ट केले.

## ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी) – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इ. उड्डाण क्रियांना पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दि.३० मे ते दि.२८ जुलै दरम्यान प्रतिबंध करण्यात येत आहे,असे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहे. या देशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम्म २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय खतविक्री आराखडा; खत खरेदीचे मोबाईल ॲप; पथदर्शी प्रकल्पात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखडा प्रकल्पांतर्गत **IFMS** व Agristack प्रणालीचे संयुक्तीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे क्यू आर कोड द्वारे खत खरेदी करता येणार आहे. या खत वितरण प्रणालीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्यासाठी राज्यात छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे,असे कृषी संचालक पुणे यांनी कळविले आहे.

यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, केंद्र शासनाने Fertilzer sale application system ( FSAS) हे मोबाईल ॲप तयार केले आहे. या ॲपद्वारे क्युआर कोड द्वारे शेतकऱ्यांना खतांचे बुकींग करता येणार आहे. शेतकऱ्यांनी क्युआर कोड द्वारे खत बुक केल्या नंतर क्युआर कोड तीन दिवस वैध राहणार असून शेतकरी त्यांच्या सोयीनुसार त्यांनी निवडलेल्या खत विक्रेत्याकडे जाऊन खत खरेदी करू शकतात. यामुळे खताचे online booking केल्याने रांगेत उभे राहावे लागणार नाही. आवश्यक खताचे booking केल्यामुळे इतर अनावश्यक खते घेण्याची सक्ती दुकानदाराकडून होणार नाही. त्यामुळे खत विक्री मध्ये सुलभता व पारदर्शकता येईल.

सद्यस्थितीत दुकानांमध्ये खत उपलब्ध आहे किंवा नाही हे समजत नसल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रास होत असल्याचे दिसून येते, वरील प्रणालीमुळे या गोष्टी टाळता येणार आहेत.

या वितरण प्रणालीची केंद्र शासनाच्या टीम ने पुणे जिल्ह्यातील अष्टापुर ता हवेली येथे यशस्वीपणे चाचणी घेतली आहे. राज्यातील कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्याची केंद्र शासनाने निवड केली असून पथदर्शी प्रकल्प म्हणून खरीप हंगामात Fertilizer sale application system या प्रणालीद्वारे खत विक्रीची सुरुवात करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

# सर्वोच्च न्यायालयात विशेष लोकअदालत; ३१ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी दि.२१, २२ व २३ ऑगस्ट रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षकारांनी आपली सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यासाठी दि.३१ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा,असे आवाहन करण्यात आले आहे. या विशेष लोकअदालतीचा उद्देश सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा संमती आधारीत निराकरण प्रक्रियेद्वारे सलोख्याने निपटारा करणे हा आहे. त्यासाठी पक्षकार, वकील ह्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. https://forms.gle/iqxefqF4BCWzukoP6 या गुगल लिंकवर अर्ज भरता येणार आहे. तसेच https://www.sci.gov.in या संकेतस्थळावरुनही अर्ज भरता येणार आहे. या लोकअदालतीत पक्षकारांना आभासी पद्धतीने उपस्थित राहण्याची सुविधा देण्यात आली आहे. दि.३१ मे पर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. या विशेष लोकअदालतीत सहभाग घेण्याचे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गिरीश अग्रवाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती वैशाली फडणीस यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आपल्या जिल्ह्यातील विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्र सेविका समितिच्या प्रबोध व प्रवेश शिक्षा वर्गाचा समारोप कार्यक्रम ३० मे ला संपन्न होणार

# संपूर्ण गणवेश आणि घोषासह निघालेल्या पथसंचलनातून शिस्तीचे प्रदर्शन



छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- भारत मातेच्या कल्याणासाठी व संघटनेतील कार्यकर्त्यांच्या गुणांचे दृढीकरण व्हावे सेवाभाव अधिक सक्षम व्हावा तसेच निष्ठावान व सक्षम सेविका घडाव्यात यासाठी दरवर्षी प्रवेश आणि प्रबोध प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते.

यावर्षीचा प्रवेश आणि प्रबोध शिक्षा वर्ग छत्रपती संभाजीनगर शहरात दिनांक १५ मे पासून डॉक्टर हेडगेवार रुग्णालयाच्या श्रीरामचंद्र मेडिकल कॉलेज मध्ये सुरू झाला. राष्ट्र सेविका समितिच्या प्रवेश वर्गात ७१ शिक्षार्थी, प्रबोध वर्गात ६३ शिक्षार्थी व एकूण ११ शिक्षिका सहभागी आहेत.

त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून दिनांक २८ मे २०२६ रोजी वर्गातील शिक्षार्थ्यांचे पथसंचलन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाले. वंदे मातरम मैदान - मे फेअर अपार्टमेंट - ओंकारेश्वर चौक - रोपळेकर चौक - अमृत बाल रुग्णालय आणि पुनश्च वंदे मातरम मैदानावर समारोप असा मार्ग होता. संभाजीनगर मधील बंधू भगिनींनी पुष्पवृष्टी करून अतिशय उत्साहात संचलनाचे स्वागत केले. संचलनात २ घोष गण म्हणजे ५२ घोष वादक होते. ध्वजासाठी सुसज्ज सजवलेली ओपन जीप संचलनाचे आकर्षण ठरले. निरीक्षण मंचावर मा. मनिषा ताई संत (अखिल भारतीय शारीरिक प्रमुख राष्ट्र सेविका समिति) ह्यांची विशेष उपस्थिती होती, राधा ताई भिडे (वर्गाधिकारी प्रबोध शिक्षा वर्ग), मा. संघमित्रा ताई कापडी (वर्गाधिकारी प्रवेश शिक्षा वर्ग), मा. अंजली ताई बडवे (देवगिरी प्रांत सहकार्यवाहिका) ह्या देखील उपस्थित होत्या. या वर्गाचा समारोप कार्यक्रम दिनांक ३० मे रोजी सायंकाळी ५.४५ वाजता हेडगेवार रुग्णालयाच्या बीड बायपास येथील वैद्यकीय महाविद्यालयात संपन्न होणार असून या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सौ स्वातीताई शिरडकर डॉक्टर सौ. ज्योत्स्ना क्षीरसागर आणि प्रमुख वक्त्या म्हणून राष्ट्र सेविका समितीच्या अखिल भारतीय सह बौद्धिक प्रमुख माननीय लीनाताई गहाणे उपस्थित राहणार आहेत. या समारोप कार्यक्रमास मोठ्या संख्येत सहकुटुंब उपस्थित राहावे असे आवाहन पश्चिम क्षेत्र कार्यवाहीका माननीय सुनंदा जोशी आणि देवगिरी प्रांत कार्यवाहीका सुनीता तालखेडकर यांनी केले आहे.

# ०१ जूनला लोकशाही दिन आयोजित होणार नाही

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्वेवार्षिक निवडणूक २०२६ कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार निवडणुकीच्या आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम निर्गमित केलेल्या वेळेपासून व दिनांकापासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणुकांकरिता जिल्ह्यांच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील असे नमूद आहे.

शासन परिपत्रक क्र. प्रसुधा २०११/प्र.क्र.१८९/११/१८-अ मंत्रालय, मुंबई - ३२ दिनांक २६ सप्टेंबर २०१२ मधील मुद्दा क्र.५.७ अन्वये ज्या ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीकरिता आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे अश्या ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये असे नमूद आहे.

सबब राज्य निवडणूक आयोगाचे पत्र व शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार महानगरपालिका स्तरावरील दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा महानगरपालिका लोकशाही दिन दिनांक:- ०१-०६-२०२६ रोजी आयोजित केला जाणार नाही याची नौद घेऊन त्याची आपले स्तरावर व्यापक प्रसिद्धी करावी ही विनंती.

# 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६'चा उत्साहात शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६' च्या पहिल्या दिवसाचा समारोप उत्साहपूर्ण आणि यशस्वी वातावरणात झाला. या परिषदेत उद्योगक्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ, उद्योजक, धोरणकर्ते, गुंतवणूकदार तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींनी सहभाग नोंदवत औद्योगिक विकास आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधींवर सखोल चर्चा केली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीनगरच्या विकासाचा प्रवास आणि भविष्यातील क्षमता दर्शविणाऱ्या विशेष सादरीकरणाने झाली. स्वागतपर भाषणात शहरातील वेगाने होत असलेली औद्योगिक प्रगती, इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील वाढत्या संधी, पायाभूत सुविधा विकास आणि औद्योगिक परिसंस्था निर्मितीवर प्रकाश टाकण्यात आला.

पहिल्या दिवशी विविध प्रेरणादायी व्याख्याने, संवाद सत्रे आणि परिसंवाद आयोजित करण्यात आले. यामध्ये डॉ. उदय नारंग (ओमेगा सेकी मोबिलिटी), डॉ. बाबू पद्मनाभन (स्टिअर वर्ल्ड), अजय जैन (आयआयएम कलकत्ता इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर), नितीन गुप्ता (अटेरो रिसायकलिंग), विशाल मेहता (अनवेस्ट), रजत बहल (पर्ल अलॉयज), भावेश ठक्कर (ईवाय), रोहित चतुर्वेदी (कॉग्निझंट), कृष्ण काछेला (नुवामा वेल्थ), गौरव अस्थाना (ट्रान्सजोव्हन कॅपिटल) आणि मृगांक जैन (ग्लोबल साऊथ कॅपिटल) यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक कुमारी दर्शन संचेती यांनी केले, तर विविध सत्रांमधील मान्यवर वक्त्यांचा परिचय कुमारी भाविका जैन यांनी करून दिला. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक खुलली.

भारताच्या उत्पादन क्षेत्रातील वाढ, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि ईव्ही इकोसिस्टम, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सर्क्युलर इकॉनॉमी, रिसायकलिंग, गुंतवणूक, विकास भांडवल आणि उद्योजकता हे चर्चेचे प्रमुख विषय होते.

वक्त्यांनी छत्रपती संभाजीनगर हे देशातील उदयोन्मुख उत्पादन आणि ईव्ही हब म्हणून वेगाने विकसित होत असल्याचे अधोरेखित केले. अलीकडील औद्योगिक गुंतवणूक, स्थानिक उद्योजकांचे प्रयत्न, उद्योग संघटनांचे सहकार्य आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे शहराला नवी ओळख मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

परिषदेला उद्योजक, उद्योगपती, व्यावसायिक, गुंतवणूकदार, स्टार्टअप संस्थापक आणि युवा व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभर आयोजित नेटवर्किंग सत्रांमुळे सहभागींच्या परस्पर संवाद, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाला चालना मिळाली.

आयोजकांनी सांगितले की, ही परिषद केवळ उत्पादन क्षेत्रापुरती मर्यादित नसून औद्योगिक विकासामुळे निर्माण होणाऱ्या व्यापक संधी समजून घेण्यासाठी आणि त्याचा लाभ घेण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. उत्पादन क्षेत्राच्या वाढीमुळे लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, पायाभूत सुविधा, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रांमध्येही मोठ्या संधी निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

परिषदेचा दुसरा दिवस ३० मे रोजी 'इकोसिस्टम ग्रोथ ट्रॅक'ला समर्पित असून वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, फॅमिली बिझनेस, गुंतवणूक आणि शहरी पायाभूत सुविधा या विषयांवर विशेष चर्चा होणार आहे. जितो छत्रपती संभाजीनगर चॅप्टरतर्फे आयोजित या परिषदेचा उद्देश छत्रपती संभाजीनगर आणि देशाच्या विकासाच्या पुढील पर्वात उद्योग, समाज आणि विविध घटकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा आहे.

## युवक काँग्रेसने पेट्रोल पंपावर केले 'मेलॉडी खाओ सब भुल जाओ आंदोलन'

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- इंधन दरवाढीच्या विरोधात शहागंज येथील पेट्रोल पंपावर युवक काँग्रेसच्या वतीने 'मेलॉडी खाओ सब भुल जाओ' आंदोलन केले. आठ दिवसांत चार वेळेस पेट्रोल, डिझेल व सिएनजीचे दर सतत वाढत असल्याने देशात महागाई वाढत आहे. रस्त्यावर उतरून जनतेमध्ये जावून काँग्रेस सरकारच्या विरोधात आंदोलन करत आहे. मोदी एकीकडे सांगत आहेत पेट्रोल डिझेल, गोडतेलचा कमी वापर करा, घरात बसून काम करा, सोने एक वर्ष खरेदी करु नका, विदेश दौरे करु नका आणि स्वतः विदेश दौ-यावर जावून मेलॉडी चॉकलेट वाटत आहे आणि देशातील जनता महागाईने होरपळत आहे. बेरोजगारा वाढत आहे. देशावर आर्थिक संकट आले आहे. आता देशाला अशा संकटातून वाचवण्यासाठी काँग्रेसची गरज आहे. राहुल गांधी यांना पंतप्रधान बनवण्यासाठी देशभरात काँग्रेस रस्त्यावर उतरली आहे. जनतेचे प्रश्न जाणून घेत आहे. ते सोडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे अशी प्रतिक्रिया यावेळी युवक काँग्रेसचे सह प्रभारी नवज्योत सिंह संधू यांनी आंदोलनानंतर दिली.

प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष आमेर अब्दुल सलीम यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. तात्काळ इंधनाची दरवाढ मागे घ्यावी अशी मागणी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

(पान १ वरुन)

## एल निनोचा परिणाम;...

मात्र वायव्य भारत, ईशान्य भारत आणि दक्षिण द्विपकल्पाचा काही भाग तसेच मध्य भारतातील काही तुरळक भाग वगळता अन्य भागात सामान्य ते सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे.

जूनमध्ये देशाच्या बहुतेक भागात सरासरीपेक्षा जास्त मासिक कमाल तापमान असण्याची शक्यता आहे. मात्र मध्य, वायव्य आणि पूर्व भारतातील काही भाग वगळता सामान्य ते सरासपेक्षा कमी कमाल तापमान असण्याची दाट शक्यता आहे. वायव्य, मध्य आणि लगतच्या दक्षिण द्विपकल्पीय भारताचे काही भाग वगळता देशाच्या बहुतेक भागामध्ये मासिक किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. म्हणजेच महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगण, हिमाचल प्रदेश आणि तामीळनाडूमध्ये उष्णतेच्या तीव्र लाटा असतील, असे या अंदाजात म्हटले आहे.

## ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या...

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड होते.

शिष्टमंडळासोबत चर्चा करताना मनोज जरांगे म्हणाले की, "राज्य सरकारने या आधी हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला, पण सातारा गॅझेटचा जीआर अद्याप काढला नाही. सरकारने कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्याचं सांगितलं होतं, मग त्यांना अद्याप प्रमाणपत्रं का दिली नाहीत? राज्यात ज्या ५८ लाख कुणबी नोंदी मिळाल्या आहेत त्यांची यादी द्या. त्या ५८ लाखांपैकी किती जणांना कुणबी प्रमाणपत्र दिली याची माहिती द्या."

मराठवाड्यात ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नका असे आदेश मुख्यमंत्री कार्यालयातून आले असल्याचा आरोप यावेळी मनोज जरांगे यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे जाण्याचे कुणाचे धाडस नाही. त्यामुळे त्यांनी हैदराबाद गॅझेट लागू करा असा आदेश द्यावा, उद्या सकाळपासून कुणबी प्रमाणपत्राचं वाटप होईल असं जरांगे म्हणाले. नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबवणार नाही, हैदराबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी करणार असं लेखी द्या, अशी मागणी यावेळी मनोज जरांगे यांनी केली.

## अजित पवार विमान....

भेट दिल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. पवार हे कुलूप घेऊन 'सीआयडी' कार्यालयात आले होते.

'राज्यातील महत्त्वाच्या नेत्याचा अपघातात मृत्यू झाला आहे. अद्याप सत्य बाहेर आले नाही. या प्रकरणाचा तपास नेमका कोणत्या दिशेने सुरू आहे. तो कोठपर्यंत पोहोचला आहे, याची सविस्तर माहिती जनतेला मिळायली हवी. तपास यंत्रण अकार्यक्षम आहे', असा आरोप पवार यांनी पत्रकारांशी बोलताना केला. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कुलूप घेऊन प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले', असे पवार यांनी नमूद केले.

## पेट्रोल-डिझेल दरवाढ आणि....

अशोक धवड प्रामुख्याने उपस्थित होते.

याशिवाय अखिल भारतीय काँग्रेसचे सहसचिव नितीन कुंभलकर, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव याज्ञवल्क्य श्रीकांत जिचकार, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष किशोर कन्हेरे, नागपूर ग्रामीण काँग्रेसचे अध्यक्ष अश्विन बैस, नागपूर शहर काँग्रेस महिला अध्यक्षा संगीता तलमले, एनएसयूआयचे नागपूर अध्यक्ष अश्विन नवाले आणि प्रदेश काँग्रेस सरचिटणीस संजय दुबे व संदेश सिंगलकर यांनीही आंदोलनाचे नेतृत्व केले.

## हायकोर्टांनी निकाल तीन..

जारी केला. या प्रकरणात अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायातील चार दोषींच्या याचिकांचा समावेश आहे. त्यांनी सांगितले की, त्यांचे फौजदारी अपील २०२२ पासून झारखंड उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, परंतु अद्याप निकाल दिलेला नाही. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, निकालास होणारा हा विलंब संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत हमी दिलेल्या जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करतो. यामध्ये वेळेवर सुनावणीचा आणि न्याय मिळण्याच्या अधिकाराचा समावेश आहे.

यापूर्वी, नोव्हेंबर २०२५ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने सर्व उच्च न्यायालयांकडून अहवाल मागवला होता, ज्यात कोणत्या प्रकरणांचे निकाल राखून ठेवले आहेत, ते केव्हा दिले गेले आणि आदेश वेबसाइटवर केव्हा अपलोड केले गेले, याची माहिती देण्यास सांगितले होते.